# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

# इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, वर्धा

**वर्ग : बी.ए. सत्र सहा**

**विषय : मराठी साहित्य**

**प्रश्नपत्रिका**

---

१. चरित्र म्हणजे काय? ते स्पष्ट करून चरित्राचे विविध वैशिष्ट्ये स्पष्ट करा. १६

**किंवा**

'एक होता कार्व्हर' या चरित्रातील कथानक तुमच्या शब्दात लिहा.

२. चरित्र म्हणजे काय? ते सांगून मराठीतील चरित्र वाङ्मयाची वाटचाल स्पष्ट करा. १६

**किंवा**

'एक होता कार्व्हर' या चरित्रातून अमेरिकेचे समाजदर्शन कशाप्रकारे चित्रित झालेले आहे?

**३. खालील वाक्याचे संदर्भासहित अर्थ स्पष्ट करा. १६**

१.''जार्ज, उद्या सकाळी आपल्याला त्या द्राक्षवाल्या यायगरकडं जायचंय बरं का!''

२.''थोडे दिवस हा अभ्यास बाजूला ठेवून तू चित्रकलेचं किंवा संगीताच शिक्षण का पुरं करत नाहीस?''

३. तो भला कृषितज्ज्ञ आमच्या संस्थेत रूजू आहे. त्याच्याच मार्गदर्शनाखाली संशोधन चालू आहे. त्यासाठी आम्हाला तीन वर्ष पुरेल एवढा खताचा साठा हवा आहे.''

४.''सांगायला वाईट वाटतंय. आम्ही निग्रो मुलांना प्रवेश देत नाही. माझ्या माहितीप्रमाणे असा प्रवेश मागणारे तुम्हीच पहिले आहात.''

**किंवा**

१. ''हे आहेत एका जातिवंत माळ्याचे हात. नुसत्या स्पर्शाने संजीवनी देणारे!''

२. ''उगी, उगी रडू नकोस. मी काही तुला मारण्यासाठी नाही उठवलं. कोण आहेस रे बाळा तू? इथे या पडक्या गोठ्यात का झोपला आहेस?''

३. ''अं, हं! मागे नको फिरूस, पुढे हो, वाजव. तुझे हात, तुझी बोटं तुझ्या आवाजाला साथ देणारी आहेत. तू जातिवंत कलाकार आहेस.''

४. ''मी तुम्हाला पैशाचं उदात्त, उच्च पदाचं वा कीर्तीचं आमिष दाखवू शकत नाही. पहिल्या दोन गोष्टी तुम्ही उपभोगत आहात, शेवटची तुम्ही कुठेही मिळवू शकाल.''

**४. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **१६**

१. महानुभाव संप्रदायाचा आचारधर्म थोडक्यात स्पष्ट करा.

२. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या गुरूला कशाप्रकारे वंदन केले आहे?

३. विसोबा खेचरविरचित ‘षट्स्थल’ या ग्रंथाचा परिचय आपल्या शब्दांत लिहा.

४. ‘तुका झालसे कळस’ असे का म्हणतात?

**किंवा**

१. महानुभाव संतांच्या कार्याचा आढावा घ्या.

२. संत ज्ञानेश्वरांच्या काळातील सामाजिक परिस्थिती विशद करा.

३. ‘संत नामदेव हे उत्कृष्ट धर्मप्रचारक होते’ या विधानाचे समर्थन करा.

४. संत तुकारामांच्या लोकप्रियतेचे रहस्य कोणते?

**५. खालील सर्वच प्रश्नांची संक्षिप्तपणे उत्तरे लिहा.** **१६**

१. चरित्र म्हणजे काय?

२. चरित्र लेखनाचे हेतू सांगा.

३. ‘एक होता कार्व्हर’ या पुस्तकातून शिकण्यायोग्य तीन गोष्टी सांगा.

४. जग जिंकण्याची ताकद कोणात असते, असे प्रा. जॉर्ज कार्व्हर सांगतात?

५. वाक्याचे प्रकार सांगा.

६. वाक्यविचार सकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.

७. प्रमाणभाषा व बोली यातील फरख स्पष्ट करा.

८. पोटभाषा म्हणजे काय?